**३.निधीच्या विनियोगाचे सूत्र, कालमर्यादा:**

१. ग्राम पंचायतीला प्राप्त झालेल्या निधीचा विनियोग खालील सूत्रानुसार करणे बंधनकारक राहील:

अ. पायाभूत सुविधा : १/४ निधी

ब. पेसा व वनहक्क अंमलबजावणी : १/४ निधी

क. स्वच्छता, आरोग्य, शिक्षण व अनुषंगिक विषय : १/४ निधी

ड. वनीकरण, वन्यजीव संवर्धन, जलसंधारण, वनतळी, वन्यजीव पर्यटन व वन उपजिविका : १/४ निधी

२. उपरोक्त पैकी प्रत्येक वर्षी एका क्षेत्राची निवड करून त्यातील कामे राबविता येतील.

३. पुढील वर्षांमध्ये इतर तीन क्षेत्रातील कामे केल्यावरच पुन्हा पहिल्या क्षेत्रातील काम घेता येईल.

४. प्रत्येक वर्षी प्राप्त निधीचा खर्च पूर्ण करण्यासाठी ग्राम पंचायतीस दोन वर्षे कालावधी उपलब्ध राहील ( चालू व पुढील वर्ष ).

**४. निधीच्या खर्चातील अननुज्ञेय बाबी :**

सदर निधीतून खालील बाबींकरिता खर्च करता येणार नाही.

- सदर निधीतून वैयक्तिक लाभ ( खालील अपवाद वगळता ) देऊ नये:
  - ➢ अपंगाना उपकरणे /तत्सम सहाय्य.
  - ➢ अल्प व अत्यल्प भूधारकांना शेतजमीन विकास ,जलस्त्रोत विकासासाठी सहाय्य.
- सदर निधीचा वापर करताना आदिवासी उपयोजनेतील नियमित योजना, शासनाच्या विविध विभागांच्या नियमित योजना, जिल्हा वार्षिक योजना, वित्त आयोगाचे अनुदान इत्यादीतील तरतुदींची व कामांची पुनरावृत्ती (Duplication) होणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच एकाच कामासाठी किंवा कामाच्या वावासाठी अन्य नियमित योजनेमधील निधीचा व या योजनेमधील निधीचा वापर होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.
- ५ %निधीतून प्रत्येक आर्थिक वर्षात होणाऱ्या एकूण खर्चामध्ये बांधकामावरील खर्चाचे प्रमाण ४० %पेक्षा अधिक असू नये.
- रस्त्याची कामे केवळ खालील मर्यादेतच घ्यावीत:
  - ➢ ग्राम पंचायत कार्यालय, आरोग्य केंद्र, अंगणवाडी, शाळा, दहन-दफन भूमी व तत्सम पायाभूत सुविधा, गावाचे अंतर्गत रस्ते.
  - ➢ वैयक्तिक घरांना जोडणारे रस्ते सदर निधीतून घेऊ नयेत.
- ग्राम पंचायत प्रवेशद्वार अथवा तत्सम निव्वळ सुशोभीकरणाची कामे सदर निधीतून करू नयेत.
- ग्राम पंचायतीच्या कर संकलनाचे उद्दिष्ट )जसे पाणीपट्टी, मालमत्ता कर वसुली (अथवा स्वत:च्या महसुलातून करावयाचा खर्च) जसे वीज बिल अदायगी (यामध्ये कमी पडणारी रक्कम भरून काढण्यासाठी सदर निधीचा वापर करू नये.
- एखाद्या कामातील लाभार्थी हिस्स्याची (Beneficiary Contribution) रक्कम भरण्यासाठी सदर निधीचा विनियोग करू नये.
- कोणतेही सण /समारंभ /धार्मिक विधी यासाठी सदर निधीचा वापर करू नये.
- आदिवासी उप योजनेच्या मूळ तत्वांना अनुसरून, सदर निधीचा वापर सुस्पष्टपणे आदिवासी जनतेच्या कल्याणाकरिता होईल याची दक्षता घ्यावी व कोणत्याही परिस्थितीत इतर कारणासाठी त्याचा अपव्यय होणार नाही याची खबरदारी घ्यावी .